देवतांची उपासना : शक्ति – खंड १

# शक्तीचे प्रास्ताविक विवेचन

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**पू. संदीप गजानन आळशी**



## सनातन संस्था




**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४४, इंग्रजी २०१, कन्नड १९८, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**मार्च २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९६ लाख ३१ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ ‘सनातन संस्थे’ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी ‘गुरुकृपायोग’ या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.३.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०५३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक ‘सनातन प्रभात’चे संस्थापक-संपादक

५. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. ‘हिंदु राष्ट्रा’च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना आध्यात्मिक स्तरावर दिशादर्शन!

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**

स्थूल देहा असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

### परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या उपाधीविषयीचे विवेचन !

थोर महर्षींनी सहस्रो वर्षांपूर्वी नाडीपट्ट्यांमध्ये भविष्य लिहून ठेवले आहे. या जीवनाडीपट्ट्यांच्या वाचनाच्या माध्यमातून महर्षी सनातन संस्थेला मार्गदर्शन करतात. १३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. असे असले तरी, त्यापूर्वीच्या लिखाणात किंवा आताही साधक लिहून देत असलेल्या लिखाणात त्यांनी 'प.पू.' किंवा 'परात्पर गुरु' अशी उपाधी वापरली असेल, तर ती तशीच ठेवली आहे.

---

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या उत्तराधिकाऱ्यांच्या उपाध्यांविषयीचे विवेचन !

जीवनाडीपट्टी-वाचनाद्वारे सप्तर्षींनी केलेल्या आज्ञेनुसार १३.५.२०२० पासून सद्गुरु (सौ.) बिंदा सिंगबाळ यांना 'श्रीसत्शक्ति' आणि सद्गुरु (सौ.) अंजली गाडगीळ यांना 'श्रीचित्शक्ति' या उपाध्यांनी संबोधले जात आहे.

**टीप :** ग्रंथातील काही सूत्रांच्या (मुद्यांच्या) शेवटी मराठी किंवा इंग्रजी अक्षरांत संकेतांक वा सांकेतिक चिन्हे कार्यालयीन सोयीसाठी दिली आहेत. त्यांचा लिखाणाशी संबंध नाही.

# अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)


१. 'शक्ति' या शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ १२

२. शक्तींच्या नावांचा, सामर्थ्याचा आणि गुणांचा गोंधळ १३

३. आद्याशक्ती १४

३ अ. अर्थ ३ आ. काही इतर नावे १४

३ इ. तीन मुख्य रूपे : महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती १५

४. शक्तींची निर्मिती १५

४ अ. एखाद्या देवाने निर्मिती करणे १५

४ आ. देवांच्या शक्तींच्या एकत्रिकरणाने निर्मिती होणे १६

५. शक्तीचे प्रकार १६

५ अ. भगवंताच्या शक्ती : अंतरंग, तटस्थ आणि बहिरंग १६

५ आ. 'विद्या' आणि 'मोहिनी' १७

५ इ. कार्यानुसार प्रकार : उत्पत्ती, स्थिती आणि लय यांच्याशी संबंधित शक्ती १७

५ ई. ब्रह्मदेवाशी संबंधित शक्ती : ब्रह्माणी आणि सरस्वती १९

५ उ. श्रीविष्णूशी संबंधित शक्ती : श्री लक्ष्मी २०

५ ऊ. शिवाशी संबंधित शक्ती : पार्वती २५

५ ए. श्री गणपतीशी संबंधित शक्ती : शारदा ४७

५ ओ. देवांशी असलेल्या संबंधानुसार प्रकार ४९

५ औ. गौणशक्ती : योगिनी, मातृका आणि नदीरूप शक्ती (गंगा, नर्मदा अन् काही इतर पवित्र नद्या) ५०

५ अं. योगमार्गानुसार प्रकार ५९
५ क. मनुष्याशी संबंधित शक्ती ५९
५ ख. मानसिक आणि आध्यात्मिक गुणांवर आधारित मनःशक्ती ५९
५ ग. शक्तीचा वापर करणाऱ्याच्या वृत्तीनुसार ६०
५ घ. उन्नतांमधील शक्ती आणि तिचा व्यय होण्याची काही कारणे ६०
५ च. चांगली आणि त्रासदायक शक्ती ६२
**६. सप्तलोक आणि शक्तीचे प्रमाण ६३**
**७. कार्य ६४**
७ अ. कोणत्याही कार्यसिद्धीसाठी शिव व शक्ती दोन्ही आवश्यक ६४
७ आ. लक्ष्मीतंत्रानुसार कार्य ६४
**८. मर्यादा ६५**
**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या ! ७०**
**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ७३**

सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या एक आध्यात्मिक उत्तराधिकारी श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ यांना पूर्वी सूक्ष्म-जगतातील एक विद्वान किंवा गुरुतत्त्व यांच्या माध्यमातून ज्ञान मिळायचे.

**देवतांची उपासना भावपूर्ण करण्यास शिकवणारा सनातनचा लघुग्रंथ !**

**देवीपूजनाचे शास्त्र**



卐 नवरात्रात घटस्थापना का करावी ?

卐 दिवाळीतील लक्ष्मीपूजनाचे महत्त्व काय ?

卐 देवीला कुंकुमार्चन करण्यामागील शास्त्र काय ?

## ग्रंथमालिकेचे सामाईक मनोगत

देवतेविषयी अध्यात्मशास्त्रीय माहिती कळली, तर तिच्याविषयी श्रद्धा वाढायला साहाय्य होते. श्रद्धेमुळे उपासना भावपूर्ण व्हायला साहाय्य होते आणि अशी उपासना अधिक फलदायी असते.

शक्तीपूजकांना आणि शक्तीची सांप्रदायिक साधना करणाऱ्यांना या ग्रंथमालिकेतील अध्यात्मशास्त्रीय माहिती निश्चितच उपयुक्त ठरेल; परंतु सर्वसाधारण व्यक्तीने मात्र या संदर्भात पुढील नियम लक्षात ठेवावा. रामायण वाचले की श्रीरामाची, गणपति अथर्वशीर्ष वाचले की श्री गणपतीची उपासना करावी, असे काही जणांना वाटते. त्याच धर्तीवर या ग्रंथमालिकेतील माहिती वाचून 'आपणही श्री लक्ष्मी, श्री दुर्गा आदी देवींची उपासना करावी', असे काही जणांना वाटण्याची शक्यता आहे. परंतु अशा प्रकारच्या उपासनेने सगळ्यांचीच आध्यात्मिक उन्नती वेगाने होत नाही; कारण श्री लक्ष्मी, श्री दुर्गा आदी देवींची उपासना करणे त्यांना आवश्यक असले, तरच त्या उपासनेचा जास्त लाभ होतो, नाहीतर पुष्कळ साधना करूनही फारच थोडी प्रगती होते. अशा देवींची उपासना करणे आवश्यक आहे कि नाही, हे सर्वसाधारण व्यक्तीला कळत नाही; म्हणून त्याने केवळ माहिती म्हणूनच ही ग्रंथमालिका वाचावी. शक्तीची अनुभूती येण्याच्या दृष्टीने साधनेचा पहिला टप्पा म्हणून स्वतःच्या कुलदेवतेचा नामजप करावा. कुलदेवतेच्या उपासनेविषयी माहिती प्रस्तुत ग्रंथमालिकेत दिली आहे. (श्री लक्ष्मी, श्री दुर्गा आदी कुलदेवता असल्यास त्यांची उपासना अवश्य करावी.) पुढे गुरूंनी अन्य एखाद्या देवीचा नामजप करण्यास सांगितल्यास किंवा साधनेच्या पुढच्या टप्प्यात आध्यात्मिक उन्नतीसाठी त्या देवीचा नामजप करणे आवश्यक असल्यास त्या वेळी या ग्रंथमालिकेतील माहितीचा उपयोग त्या देवीप्रती श्रद्धा वाढण्यासाठी होईल. इतरांना ग्रंथातील माहिती वाचून विविध देवींविषयी काहीतरी नवीन कळले, असे जाणवेल.

ही ग्रंथमालिका वाचून भक्तांची देवीवरील श्रद्धा अधिक दृढ होवो आणि प्रत्येकाला साधना करण्याची प्रेरणा मिळो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**